# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१३/०९/२०१६

**१) चाकुचा धाक दाखवुन पैशे हिसकावुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ११/०९/२०१६ रोजी २०.०० ते २०.१५ वा. दर. यातील फिर्यादी हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ आर १९४८ ने स्वःताचे गावी परसोडी येथे जांभळी ते गुढरी मार्गाने जात असता कोणीतरी अनोळखी इसमांनी रोडवर आडवा तार लांबलेला दिसल्याने फिर्यादीने गाडी हळु करताच ६ अनोळखी इसमांनी आपले तोंडाला काळे पांढरे मुस्के बांधुन फिर्यादीला चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे थैल्यातील नगदी ३,५००/—रू. हिसकावुन नेल्याने फिर्यादी व्यंकट दुर्योधन भानारकर वय ३६ वर्ष रा. परसोडी/मानेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३९५,३९७ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलाला फुस लावुन पळवुन नेले . :—**

दिनांक २९/०८/२०१६ रोजी चे आज पावेतो यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा याला पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व महाराष्ट्र शासनाचे परीपत्रक क्र. सिआरआय—०९१२ क्र. ५४/ टोल—१३ दि. १३/०४/२०१३ अन्वये पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) विवाहीतेस शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०१५ ते आज पावेतो यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन त्यांचा प्रेम विवाह बगलोर येथे झाला आहे. यातील आरोपी पती हा फिर्यादीस नेहमी शारीक व मानसीक त्रास देत असल्याने व माहेरून २०,०००/—रू. आण असे म्हणुन तिला जिवाने मारण्या—पिटण्याची धमकी देत असल्याने व महीला समुपदेशक केंद्र तुमसर यांचे अहवाल व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४९८(अ),५०६ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक १२/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, मोहाडी, कारधा, करडी, गोबरवाही, साकोली, व लाखनी येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३९ लिटर ५०० मिली हातभट्टी दारू कि. २१,००/—रू. ९०० मिली देशी दारू कि. २५०/—रू. तसेच जुगारातुन कि. १७५ /—रु. असा एकुण २,५२५/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

१३/९/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत. संगणक कक्ष.** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.